“स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापिठाच्या पीएच.डी.(Ph.D) पदवीच्या नोंदणीसाठी सादर करावयाचा नियोजित संशोधन प्रकल्प” आराखडा”

ठाणे जिल्ह्यातील कापड प्रक्रिया उद्योगाचा चिकित्सक अभ्यास

कालावधी २००५– २०१५

(सामाजिक शास्त्रे विद्याशाखेच्या अर्थशास्त्र विषयात पीएच.डी.पदवीसाठी)

अभ्यासक

प्रा.रघुनाथ द. कोर

(अर्थशास्त्र विभाग)

के.एम.अग्रवाल महाविद्यालय,कल्याण जि.ठाणे

मार्गदर्शक

डॉ.अजय पी. कुंटे

(अर्थशास्त्र विभाग प्रमुख)

नारायणराव वाघमारे महाविद्यालय,बाळापुर

ता.कळमनुरी जि.हिंगोली

अनुक्रमणिका

अनु.क्र.	**शिर्षक**	**पृष्ठ क्र.**
१.	प्रस्तावना	१.
२.	अभ्यास विषयाची निवड	३.
३.	अभ्यास विषयाचे महत्व	३.
४.	अभ्यासाचे उददेश	४.
५.	गृहीतकृत्य	४.
६.	अभ्यासाची व्याप्ती	४.
७.	संशोधन पद्धती	५.
८.	अभ्यासाचा कालावधी	५.
९.	प्रबंधाची रूपरेषा	५.
१०.	अभ्यासाच्या मर्यादा	६.
११.	संदर्भ सूची	७.

प्रास्ताविक:

भारतातील कापड उद्योगाची सुरवात १९ व्या शतकाच्या प्रारंभी झाली.१८१८ मध्ये कलकत्याजवळील फोर्ट ग्लेस्टर येथे पहिली कापड गिरणी सुरु झाली, तेव्हापासून या उद्योगाने भारताच्या अर्थ व्यवस्थेत महत्वाची भूमिका बजावली आहे.

शेती व्यवसायानंतर कापड उद्योग हा भारतातील महत्वाचा उद्योग असून भारतातील प्राचीन उद्योगांपैकी तो एक समजला जातो.कापड आणि वस्त्र उद्योग हा अनेक प्रगतीशील राष्ट्रांचा आधारभूत उद्योग आहे.त्यातच कापड प्रक्रिया उद्योग हा कच्च्या कापड उद्योगा मध्ये महत्वाची भूमिका बजावतो.

भारतीय कापड उद्योग तंत्रज्ञानाच्या आधारावर तीन वेगवेगळ्या विभागात व क्षेत्रात विभागले जातात.

१. मील क्षेत्र(Mill sector)- संघटीत क्षेत्र
२. हातमाग क्षेत्र (handloom sector) - संघटीत क्षेत्र
३. यंत्रमागक्षेत्र(power loom sector)- असंघटीत क्षेत्र

या तीन विभागांमार्फत कापड उद्योग चालविला जातो. भारतातील एकूण औद्योगिक उत्पादनाच्या १४%, जी.डी.पी.च्या ४% आणि एकूण निर्यातीपैकी १७% हिस्सा कापड उद्योगाचा राहिला आहे. शेती व्यवसायानंतर रोजगार उपलब्ध करून देणारा आणि कच्चा माल व त्यावर प्रक्रिया करणारा सर्वात मोठा उद्योग आहे.

सदर अभ्यासाचा विषय महाराष्ट्रामधील ठाणे जिल्हयातील कापड प्रक्रिया उद्योग हा आहे. ठाणे जिल्हयातील डोंबिवली, अंबरनाथ व उल्हासनगर येथे मोठ्या प्रमाणावर कापड प्रक्रिया उद्योग चालतो.

ठाणे जिल्हयातील भिवंडी शहर यंत्रमागावरील (power loom) कापडासाठी प्रसिध्द असून त्याला "Manchester of India" म्हणून संबोधले जाते.भिवंडीतील यंत्रमागावर तयार होणा-या कच्च्या कापडावर प्रक्रिया करणारे लघु उद्योग भिवंडी शेजारील डोंबिवली, अंबरनाथ व उल्हासनगर या तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर पसरले आहेत.या उद्योगाने महाराष्ट्र तसेच बिहार व उत्तरप्रदेशातील कामगारांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे.

या कापड प्रक्रिया उद्योगा पुढील समस्या त्याची कारणे आणि उद्योगाचे भवितव्य यांचा चिकित्सक अभ्यास केला जाणार आहे.

<u>अभ्यास विषयाची निवड :</u> <u>(selection of study)-</u>

ठाणे जिल्हयातील भिवंडी तालुका यंत्रमागावरील (power loom) कापडासाठी प्रसिध्द आहे. भिवंडीतील यंत्रमागावर तयार होणा-या कच्च्या कापडावर प्रक्रिया करणारे लघु उद्योग भिवंडी शेजारील डोंबिवली, अंबरनाथ व उल्हासनगर या तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर पसरले आहेत.या उद्योगाने महाराष्ट्र तसेच बिहार व उत्तरप्रदेशातील कामगारांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे.

या कापड प्रक्रिया उद्योगाला अनेक समस्या भेडसावतात. त्याची कारणे आणि उद्योगाचे भवितव्य याबाबत संशोधन प्रस्तुत संशोधनातून सुव्यवस्तीतपणे व्हावे या करिता वरील विषयाची निवड करण्यात आली आहे.

***<u>अध्ययनाचे महत्व</u>*: <u>(Importance Of Study) –</u>**

ठाणे जिल्हयातील निरनिराळ्या तालुक्यांमधील कापड प्रक्रिया उद्योगांची कामगिरी, उद्योगास येणा-या समस्या त्याची कारणे शोधली जाणार आहेत.त्या

संदर्भातील धोरणे व या उद्योगास मिळणारे समर्थन याचा गांभीर्याने शोध घेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

१९९१ साली भारताने स्वीकारलेल्या जागतिकीकरणाच्या धोरणानंतर भारतात अनेक बहुराष्ट्रीयकंपन्यांनी या उद्योगातप्रवेश केला आहे आणि ह्या उद्योगांशी स्पर्धा करण्यात भारतातील लघु कापड प्रक्रिया उद्योगांना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागत आहे.ठाणे जिल्ह्यातील महत्वाच्या असलेल्या या उद्योगांचे प्रश्न आणि त्यावरील उपाययोजना सुचविण्याचा प्रयत्न प्रस्तुत अभ्यासात केला जाणार आहे.

उददेश:(Objective Of The Study)–

१. ठाणे जिल्ह्यातीलकापड प्रक्रिया उद्योगाची कामगिरी (Performance) तपासणे.
२. ठाणे जिल्ह्यातीलकापड प्रक्रिया उद्योगाचे प्रश्न (Problems) समजून घेणे.
३. कापड प्रक्रिया उद्योगाच्या वृद्धीचे (Growth) घटक निश्चिती समजून घेणे.
४. कापड प्रक्रिया उद्योगाच्या भवितव्याचा अभ्यास करणे.
५. कापड प्रक्रिया उद्योगातील अडचणींवर(Problems)उपाय सुचविणे.

गृहीतके:(Hypothesis)-

१. कापड प्रक्रिया उद्योगाचे देशाच्या आर्थिक प्रगतीत महत्वाचे योगदान आहे.
२. पारंपारिक उत्पादन तंत्रामुळे तसेच बहुराष्ट्रीय कंपन्यांमुळे कापड प्रक्रिया उद्योगासमोर आव्हाने निर्माण झाली आहेत.

अध्ययनाची व्याप्ती(Scope Of Study)-

प्रस्तुत शोधनिबंधात ठाणे जिल्ह्यातील काही निवडक तालुक्यातील कापड प्रक्रिया उद्योगांचा अभ्यास केला जाणार आहे. सदरील अभ्यास विषयासाठी ठाणे जिल्ह्यातील एकुण कापड प्रक्रिया उद्योगांपैकी १००(शंभर) कापड प्रक्रिया उद्योगांची नमुना निवड पध्दतीने निवड करून अभ्यास केला जाणार आहे. या अभ्यासामुळे कापड प्रक्रिया धोरणा संदर्भात सुचविले जाणारे उपाय मार्गदर्शक ठरतील.

संशोधन पद्धती:(Research Methodology) –

सदर संशोधनासाठीप्राथमिक माहिती (Primary data) व दुय्यम माहिती, (Secondary data) माहितीचे स्त्रोत म्हणून आधारभूत मानला जाईल.
माहिती गोळा करण्यासाठी सर्वेक्षण,मुलाखत व प्रश्नावलीच्या माध्यमातून प्राथमिकमाहिती गोळा केली जाईल.

त्याचबरोबर वृत्तपत्रे,मासिके,माहितीपत्रके,संदर्भग्रंथ,ग्रंथालय पुस्तके, वेबसाईट यांच्या आधारे दुयाम माहिती प्राप्त केली जाईल.

अभ्यासाचा कालावधी:(Period of study)-

संशोधनासाठी २००५ ते २०१५ हा कालखंड विचारात घेतला जाणार आहे.ठाणे जिल्ह्यामधील काही तालुक्यातील कापड प्रक्रिया उद्योगांची संशोधनासाठी निवड केली जाणार आहे.

प्रबंधाची रूपरेषा:(Proposed chapter scheme)-

१. प्रास्ताविक
२. संदर्भ साहित्याचा आढावा
३. माहितीच्या आधारे उद्योगांच्या आजारपणाचे सर्वेक्षण
४. व्यवस्थापकीय भूमिका आणि उद्योगांसमोरील अडचणी
५. कापड उद्योगांचा आजारपणात शासकीय धोरणांची भूमिका
६. निष्कर्ष आणि उपाययोजना

अध्ययनाची मर्यादा:(Limitation Of The Study)-

सदर अभ्यासाच्या काही मर्यादा आहेत हा अभ्यास फक्त कापडप्रक्रिया उद्योगासंदर्भात मर्यादित आहे. अभ्यासासाठी २००५-२०१५ हा कालखंड विचारता घेतला जाणार आहे.

कापड प्रक्रिया उद्योगातील समस्याआणि भवितव्य (Prospectus) यावरच हा अभ्यास केंद्रित केला जाणार आहे व त्यासाठी महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्याची निवड करण्यात आलेली आहे.

या संशोधनासाठी विशेष संदर्भ म्हणून ठाणे जिल्ह्यातीलभिवंडी डोंबिवली,अंबरनाथवउल्हासनगर ह्या तालुक्यांचा विचार केला जाईल.मर्यादा आणि कामाचा दर्जा याची काळजी घेतली जाईल.

<u>संदर्भसूची:</u><u>(References)</u>

१. ठाणे जिल्हयातील औद्योगिक वसाहतींचे सर्वेक्षण

२. राज्य सरकारची मार्गदर्शक तत्वे आणि निर्देशांक

३. विविध उद्योग वेबसाइट

४. कायदे,पुस्तके, जर्नल्स,विविध माध्यमे.

अभ्यासक

प्रा.रघुनाथ द.कोर

के.एम.अग्रवाल महाविद्यालय,कल्याण

संशोधन मार्गदर्शक

डॉ.अजय पी. कुंटे

(अर्थशास्त्र विभाग प्रमुख)जि.ठाणेनारायणराव

वाघमारे महाविद्यालय,

बाळापुर ता.कळमनुरी जि.हिंगोली